# प्रेसनोट

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड      जा.क्र. 308/2024      दिनांक : 01.09.2024**

पोस्टे अर्धापुर यांनी संशयीत राशनचा तांदुळ व ट्रक 17,96,485/–रू **मुद्देमाल** घेतला ताब्यात...

**मा. श्री अबिनाश कुमार,** पोलीस अधीक्षक नांदेड यांनी, जिवनावश्यक वस्तु कायदा नुसार कार्यवाही करण्याचे आदेश दिले होते.

त्या अनुषंगाने (Operation flush out) अंतर्गत पोनि श्री चंद्रशेखर कदम, पोस्टे अर्धापुर यांचे मार्गदर्शनाखाली पथकातील पोलीस अधीकारी व पोलीस अंमलदार हे अवैध धंद्यावर कार्यवाही करण्याकरीता शासकीय जीप क्रमांक एमएच–26/आर–0525 वाहनामध्ये पेट्रोलींग करीत असतांना गुप्त बातमीदारां मार्फत माहीती मिळाली की, एका ट्रक मध्ये तांदुळ भरून चोरटया बाजारात विक्री करण्याकरीता नेत आहेत अशी खात्रीशीर माहीती मिळाल्यावरून पोलीस अधीकारी व पोलीस अंमलदार यांनी सदर संशयीत ट्रक जांभरून फाटा ता. अर्धापुर येथे हायवेवर थांबवुन तपासणी केली असता आत तांदुळ असल्याचे दिसुन आले. संबधीत ट्रकच्या चालकास सदर तांदळाच्या कागदपत्रा बाबत चौकशी केली असता कोणतेही कागदपत्र दाखवले नसल्यामुळे सदर ट्रक क्रमांक एमएच–22/एए–3366 किंमती 10,00,000/–रू व त्यातील संशयीत राशनचा तांदुळ किंमती 7,96,485/–रू असा एकुण 17,96,485/–रू चा मुद्देमाल मिळुन आल्याने, सदरचा मुद्देमाल ताब्यात घेवुन पोस्टेला आणण्यात आले आहे. व सदर ट्रकमधील तांदुळ हा राशनचा आहे किंवा कसे या बाबत पुरवठा विभागला पत्रव्यवहार करून पुढील कायदेशिर कार्यवाही करण्याचे आदेश पोउपनि श्री सुरेश भोसले, पोस्टे अर्धापुर यांना दिले आहेत.

सदरची कामगीरी **मा. श्री अबिनाश कुमार**, पोलीस अधीक्षक नांदेड, **मा. श्री खंडेराय धरणे**, अपर पोलीस अधीक्षक भोकर, **मा. श्री सुरज गुरव**, अपर पोलीस अधीक्षक नांदेड, **मा. श्री डॅनियल बेन**, उपविभागीय पोलीस अधीकारी उपविभाग नांदेड ग्रामीण यांचे मार्गदर्शनाखाली **पोनि श्री चंद्रशेखर कदम**, पोहेकॉ विजय आडे, पोकॉ महेंद्र डांगे, विजय कदम सर्व नेमणुक पोस्टे अर्धापुर तसेच मा. पोलीस अधीक्षक साहेब यांचे पथक क्रमांक 06 मधील पोउपनि श्री प्रवीण हालसे, पोहेकॉ ब्राम्हानंद लामतुरे, पोकॉ राम मुळे, महाचंद्रमुणी कांबळे, व चालक पोहेकॉ पंढरी जाधव, यांनी पार पाडुन चांगली कामगीरी केली आहे. वरिष्ठांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड